**<u>नियमित दिवाणी मुकदमा नंबर १७५/२०२१ मधील नि.८८ वरील आदेश</u>**

**१.** अर्ज व म्हणणे वाचले.

**२.** अभिलेखातील कागदपत्रे पाहिली. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

**३.** प्रतिवादी क्र.२१ ते २३ यांचे अर्जातील कथनांप्रमाणे त्यांना कैफियत व म्हणणे तयार करणेसाठी आवश्यक असणारी कागदपत्रे वेळेत उपलब्ध न झाल्याने मुदतीत कैफियत व म्हणणे दाखल करता आले नाही. त्यामुळे, त्यांचे विरुध्द तांत्रिकदृष्टया विना कैफियत व म्हणणेचा आदेश झाला आहे. वादी यांनी अर्जास हरकत घेतली आहे. परंतु, प्रतिवादी क्र.२३ यांनी अर्जाचे पृष्ठयर्थ ॲफिडेव्हीट सादर करुन ही कथने शपथेवर केली आहेत. त्यामुळे, प्रतिवादी क्र.२१ ते २३ यांनी दिलेले हे कारण संयुक्तिक वाटते. वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द हा दावा हक्क शाबितीसाठी, वाटपासाठी व निरंतर ताकिदीसाठी दाखल केला आहे. त्यामुळे, प्रतिवादी क्र.२१ ते २३ यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळणेसाठी त्यांना कैफियत व म्हणणे सादर करणेस परवानगी देणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहेः–

**<u>अंतिम आदेश</u>**

१. प्रतिवादी क्र.२१ ते २३ यांचा हा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. प्रतिवादी क्र.२१ ते २३ यांचेविरुध्द तांत्रिकदृष्टया झालेला 'विना कैफियत व म्हणणेचा' आदेश रद्द करणेत येत आहे व त्यांची कैफियत व म्हणणे अभिलेखात दाखल करुन घेणेत येत आहे.

Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2022.03.11 16:59:40 +0530

**दिनांक १०.०३.२०२२** **(डी.एम.हिंग्लजकर)**

**ठिकाण विटा.** **तिसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, विटा, ता.खानापूर, जि.सांगली.**

**MHSN150008592021** नि.दि.मु.नं. १७५/२०२१ नि.८८

*Case No : RCS No 175 of 2021*
*I affirm that the contents of this pdf file Order are same words as per original Order,*
*Name of the Typist :R R Shetty*
*Court Name: 3rd Jt. Civil & Criminal Court,Vita. Dist. Sangli.*
*Date of decision :10.03.2022*
*Order signed by P.O.on :10.03.2022*
*Order uploaded on :11.03.2022*